ePaper

एसआयटीचं पथक बीडमध्ये, वाल्मिक कराडची पावणे दोन तास चौकशी

॥ वर्ष - 8 । अंक -174 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 3 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



**आतील पानांत**

- रोहित सिडनी कसोटीत विश्रांती घेणार
- डी गुकेशसह चार खेळाडूंना खेलरत्न
- दोसांझवर शेतकरी आंदोलक संतापले
- मोदी सरकार कुचकामी ठरले!

## भाजपकडून धक्का देण्याची तयारी

# दादांसाठी अस्तित्वाची लढाई!

## पिंपरी चिंचवड बालेकिल्ल्यात पुन्हा हादरा?

। मुंबई । महाईन्यूज

**पुणे: पालकमंत्रिपदाचा पेच कायम असताना आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवरुन रस्सीखेच सुरु झालेली आहे. सत्ताधारी महायुती स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एकत्र नसेल, सत्तेत सोबत असलेले पक्ष स्थानिक पातळीवर मात्र एकमेकांच्या विरोधात असतील, याची शक्यता दिसू लागली आहे. उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांना त्यांच्याच बालेकिल्ल्यात पुन्हा एकदा धक्का देण्याची तयारी भाजपनं सुरु केली आहे.**



### दोन दादा महापालिका निवडणुकीत आमनेसामने

२०१७ मध्ये मिळवलेलं वर्चस्व कायम राखण्यासाठी आता भाजपनं पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक स्वबळावर लढवण्याची तयारी सुरु केली आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक अजित पवारांसाठी अस्तित्वाची, तर भाजपसाठी वर्चस्वाची लढाई आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार यांच्यासोबतच भाजपचे चंद्रकांत पाटीलही पुण्यातून निवडून येतात. त्यांच्यामध्ये पालकमंत्रिपदावरुन रस्सीखेच आहे. आता सरकारमध्ये असलेले हेच दोन दादा महापालिका निवडणुकीत आमनेसामने असतील.

पिंपरी चिंचवड महापालिका निवडणूक स्वबळावर लढवण्याची तयारी भाजपकडून सुरु करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानंतर आम्ही सगळ्या जागा लढवण्याची तयारी सुरु केली आहे, अशी माहिती चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी केली आहे. 'लोकसभा, विधानसभेला महायुती होती. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महायुती नाही. स्थानिक पातळीवर आम्ही स्वबळावर लढणार आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तसं स्पष्टच सांगितलेलं आहे,' असं जगताप यांनी सांगितलं.

२०१२ मध्ये राज्यात आघाडीचं सरकार असताना राष्ट्रवादी काँग्रेसनं पिंपरी चिंचवडमध्ये ८३ जागा जिंकत एकहाती सत्ता आणली. महापालिकेत एकूण १२८ प्रभाग आहेत. २०१२ मध्ये पालिकेत भाजपचे केवळ ३ नगरसेवक होते. २०१७ मध्ये झालेल्या निवडणुकीत भाजपचे तब्बल ७७ उमेदवार निवडून आले. तर राष्ट्रवादीच्या नगरसेवकांची संख्या ८३ वरुन ३६ वर घसरली. भाजपनं एकहाती विजय मिळवत अजित पवारांच्या वर्चस्वाला धक्का दिला.

# एकवीरा गडावर हाहाकार उडाला!

## फटाक्यांच्या धुराचे लोट उठताच मधमाशा चवताळल्या, तीक्ष्ण दंशामुळे 60 जखमी

। लोणावळा।
प्रतिनिधी : महाईन्यूज

लोणावळ्याजवळ कार्ला येथील एकवीरा गडावर नववर्षारंभाच्या निमित्ताने भाविकांची मोठी गर्दी उसळली होती. मात्र काही अतिउत्साही भाविकांनी मनाई असतानाही मंदिराजवळ रंगीत धुराचे फटाके फोडले. फटाक्यांमुळे मधमाशांच्या पोळ्यांना इजा पोहोचल्याने चवताळलेल्या मधमाशांनी भाविकांवर हल्ला केला. या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे गडावर एकच हाहाकार उडाला. तीक्ष्ण दंशामुळे किमान 60 भाविक जखमी झाले. त्यामध्ये महिलांसह लहान मुलांचाही समावेश आहे.



चैत्र महिन्यातील चैत्र शुद्ध प्रतिपदा पाडवा ते चैत्र अष्टमी हा एकवीरा देवीची चैत्री यात्रेचा कालावधी असतो. यात्रेतील पालखी सोहळ्याला मुंबई, ठाणे, रायगड व कोकणातील लाखो भाविक दर्शन व नवस फेडण्यासाठी येतात. मुंबईतील कुलाबा येथून देवीची पालखी घेऊन आलेल्या भाविकांपैकी काहींनी रंगीत फटाके वाजवले. त्यामुळे प्रचंड धूर झाला. गडाच्या परिसरातील झाडाच्या फांदीवर असलेल्या मधमाशांच्या पोळ्यांपर्यंत धुरांचे लोट पोहोचले. धुरामुळे मधमाशा उठल्या आणि भाविकांची पळापळ झाली. अनेकांना मधमाशांनी डंख मारला.

### कठोर पावले उचलण्याची गरज

उत्सव व यात्रेतील पालखी सोहळ्याला लाखो भाविक दर्शन व नवस फेडण्यासाठी येतात. या वेळी देवीच्या मंदिराच्या आवारात मोठी गर्दी असते. अशा वेळी अशी घटना घडल्यास किती मोठा अनर्थ होईल, याचा विचार करून अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी अतिउत्साहीपणाला आळा घालणे आवश्यक आहे. यासाठी त्या त्या पालखी प्रमुख, समाजातील जाणकारांसह देवस्थान ट्रस्ट, पुरातत्व विभाग, पोलीस व संबंधित प्रशासनाने कठोर पावले उचलण्याची गरज आहे.

मधमाशांच्या हल्ल्याने गडावर हाहाकार उडाला. भाविक सैरावैरा पळू लागले. महिलांनी ओढणीचा आधार घेतला. काहींनी जमिनीवर लोटांगण घातले. शर्ट काढून मुलांना डंखापासून वाचवण्याची धडपड अनेकजण करत होते. जखमींना लोणावळा व कार्ला येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून सर्वांची प्रकृती स्थिर आहे. ही घटना फटाक्यांच्या धुरामुळे की अन्य कारणाने घडली याचा तपास करीत असल्याचे पोलिसांनी सांगितले.

### फटाके फोडण्यावरील बंदी कडक करा

एकवीरा गडावर फटाके वाजविण्यास बंदी आहे. परंतु काही भाविक या नियमांकडे दुर्लक्ष करतात. या घटनेनंतर ग्रामस्थांनी गडावर फटाके फोडण्यावरील बंदी अधिक कडक करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. भाविकांनी गडावर नियमांचे पालन करावे आणि प्राचीन ठिकाणाच्या संवर्धनासाठी सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# विजयस्तंभ अभिवादन सोहळा उत्साहात!

## प्रशासनाचे उत्तम नियोजन आणि अनुयायांकडून शिस्तीचे पालन

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भरगच्च बसमधून प्रवास, उन्हाचा लागणारा चटका, रस्त्यांच्या कडेला ठिकठिकाणी डीजेच्या तालावर थिरकणारी तरुणाई, पोलिसांच्या सूचनांनुसार पावले चालत असताना विजयस्तंभ परिसराजवळ येताच तरुणांच्या अंगात अचानक संचारणारा उत्साह, 'जय भीम'चा जयघोष, अशा उत्साही वातावरणात आणि प्रशासनाच्या उत्तम नियोजनाला अनुयायांकडून शिस्तीचे पालन करत दिलेल्या प्रतिसादामुळे विजयस्तंभ अभिवादन सोहळा बुधवारी उत्साहात पार पडला.**



कोरेगाव भीमा येथील २०७ व्या विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी देश, तसेच राज्यभरातून लाखोंचा जनसमुदाय लोटला होता. मंगळवारी (३१ डिसेंबर) सायंकाळपासूनच विजयस्तंभ परिसरात गर्दी होण्यास सुरुवात झाली होती. बुधवारी (१ जानेवारी) पहाटेच्या सुमारास भंत्यांकडून मंत्रोच्चाराचा जागर करून प्रार्थना करण्यात आली. त्यानंतर मंत्री, नेते, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती आणि भीम अनुयायांनी दर्शन घेण्यास सुरुवात केली. विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी रात्री सात वाजेपर्यंत रस्त्यांवर गर्दी दिसून आली.या सोहळ्यासाठी गेल्या वर्षापेक्षा अधिक भीम अनुयायी येणार असल्याची शक्यता गृहीत धरून जिल्हा प्रशासनाकडून गेल्या महिनाभरापासून तयारी करण्यात आली होती. उपाययोजना आणि सुविधांच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाच्या वतीने अनेक बैठका घेण्यात आल्या होत्या. सुविधांच्या अनुषंगाने वेगवेगळ्या समित्या स्थापन करून समन्वय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या, वाहतूककोंडी आणि सुरक्षिततेच्या अनुषंगाने पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून (पीएमपी) मोफत बससेवा पुरविण्यात आली होती. भरगच्च बस लोणीकंद येथील वाहनतळापर्यंतच जात असल्याने अनुयायांना विजयस्तंभापर्यंतचे अंतर पायी पार करावे लागले. दोन्ही बाजूंनी रस्ते अनुयायांच्या गर्दीने भरून गेले होते. जिल्हा प्रशासनाकडून रस्त्यांच्या कडेला उभे करण्यात आलेले पाण्याचे टँकर, पोलीस मदत कक्ष, आरोग्य केंद्र, ज्येष्ठांसाठी निवारा कक्ष, वाहनतळ याचा पुरेपूर लाभ घेतानाचे चित्र होते. विशेषत: अनेक सामाजिक संघटनांकडून आणि भीमसैनिकांकडून पाण्याच्या बाटल्या, बिस्कीट, जेवण, ब्लँकेट आणि इतर वस्तूंचे मोठ्या प्रमाणात वाटप करण्यात आले.या अभिवादन सोहळ्यासाठी मोठ्या प्रमाणात अनुयायी येणार असल्याने प्रशासनाकडून पीएमपीच्या मोफत बसचे नियोजन केले होते. लोणीकंदपासून पेरणे फाट्यापर्यंत बसचे नियोजन केले असताना, दुपारनंतर रस्त्यांवर लोटलेला जनसागर आणि इतर सुविधांसाठी उभारण्यात आलेल्या छोट्या-मोठ्या केंद्रांमुळे लोणीकंदपासून पेरणे फाट्यापर्यंत बसच्या रांगा लागल्या होत्या. त्यामुळे अर्ध्या प्रवासातूनच अनुयायांना बसमधून उतरून पायी प्रवास करावा लागला.

### वाहतूक नियोजन उत्तम

पोलीस प्रशासनाकडून वाहतुकीचे उत्तम नियोजन करण्यात आले होते. त्यामुळे अतिमहत्त्वाच्या व्यक्तींव्यतिरिक्त कुठल्याच वाहनांना विजयस्तंभापर्यंत प्रवेश दिला गेला नाही. दोन ते तीन टप्प्यांत रस्त्यांवर लोखंडी कठडे उभे करून वाहनांना पुढे जाण्यास मज्जाव करण्यात येत होता. थेट वाहनतळांमध्ये वाहने रवाना करण्यासाठी ठिकठिकाणी पोलीस कर्मचारी तैनात होते. त्यामुळे दोन्ही बाजूंच्या चार ते पाच किलोमीटरच्या परिसरातून अनुयायांना सहज चालता येणे शक्य झाले.विजयस्तंभाच्या मागील मोकळ्या बाजूस मोठ्या प्रमाणात खाद्यापदार्थांची दुकाने, पुस्तके, खेळणी, कपडे विक्रीचे छोटे-मोठे व्यावसायिक बसल्याने विजयस्तंभाला अभिवादन करून बाहेर पडताच अनुयायांची पावले आपसूकच वस्तू खरेदी करण्यासाठी पडत होती. या केंद्रांवरदेखील मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याने सोहळ्याला जणू जत्रेचे स्वरूप प्राप्त झाल्याचे दिसून आले.

# उपमहापौर' केले आता ' महापौर' करा!

## मंत्रीमंडळात स्थान देऊन फडणवीसांनी शब्द पाळावा : आठवले

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकसभा निवडणुकीसह विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीत मित्र पक्ष म्हणून सहभागी झालेल्या 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया'ला (आरपीआय) पुरेशा जागा दिल्या नाहीत. तरीदेखील आरपीआयच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी दोन्ही निवडणुकांत महायुतीचे काम निष्ठेने केले.**



निवडणुकीपूर्वी आरपीआयला मंत्रिमंडळात स्थान देण्याचा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला होता. त्यांनी हा शब्द पाळावा, अशी मागणी आरपीआयचे अध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केली.पुण्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेत आठवले यांनी ही मागणी केली. ते म्हणाले, 'राज्याच्या सत्तेत वाटा देण्याचा शब्द महायुतीत सहभागी असलेल्या भाजप, शिवसेना (शिंदे), राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाने दिला होता. आरपीआयला मंत्रिमंडळात एक जागा द्यावी. यासाठी लवकरच मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेणार आहे. गेल्या पंचवार्षिकमध्येदेखील आरपीआयने महायुतीला खंबीरपणे पाठिंबा दिला. अडीच वर्षांच्या सत्तेत महायुतीने आरपीआयला एकही महामंडळ दिले नाही. आता मंत्रिमंडळात आरपीआयला स्थान द्यावे.'ग्रामपंचायत, नगरपालिका, तसेच महापालिकांच्या निवडणुकीत आरपीआय महायुतीबरोबर राहणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मित्र पक्ष असलेल्या आरपीआयला अधिक जागा सोडाव्यात, अशी भूमिका आठवले यांनी मांडली. महायुतीत सहभागी असलेल्या आरपीआयला पुणे महापालिकेत सत्ता स्थापन केल्यानंतर भाजपने उपमहापौरपद दिले होते. यावेळी पुणे शहराचा महापौर हा आरपीआयचा करावा. महापालिकेच्या मागील निवडणुकीत महायुतीत आरपीआयला १२ जागा मिळाल्या होत्या. आगामी महापालिकेच्या निवडणुकीत २० जागा द्याव्यात, अशी मागणी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडे करणार असून महापालिकेमध्ये आरपीआयचा महापौर होईल, असा विश्वास रामदास आठवले यांनी व्यक्त केला.लोकसभा, तसेच विधानसभेच्या निवडणुकीत आरपीआयला ठरावीक जागा द्याव्यात, अशी आमची मागणी होती.

### निवडणुकांत निष्ठेने काम केले

मात्र, महायुतीच्या नेत्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. विधानसभेच्या निवडणुकीत दोन जागा आरपीआयला दिल्याचे जाहीर करण्यात आले. मात्र, या जागांवर लढलेले उमेदवार कमळ आणि धनुष्यबाण या चिन्हावर लढले. ते काही आरपीआयचे उमेदवार नव्हते. राज्यात महायुतीला मोठे मताधिक्य मिळाले आहे. त्याची दखल घेत मंत्रिमंडळात स्थान द्यावे,' असे आठवले म्हणाले.लोकसभा निवडणुकीसह विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीत मित्र पक्ष म्हणून सहभागी झालेल्या 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया'ला (आरपीआय) पुरेशा जागा दिल्या नाहीत. तरीदेखील आरपीआयच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी दोन्ही निवडणुकांत महायुतीचे काम निष्ठेने केले.

## प्रशासक शेखर सिंह यांच्या समवेत माजी नगरसेवकांसह बैठक

# चिंचवडचे आमदार शंकर जगताप 'ॲक्शन मोड'वर!

## मतदार संघातील विकासकामांना गती देण्यासाठी घेतली बैठक

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**विधानसभेचे नागपूर हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर भाजपचे शहराध्यक्ष व चिंचवडचे आमदार शंकर जगताप 'ॲक्शन मोड'वर असल्याचे पाहायला मिळत आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघातील विकासकामे आणि मूलभूत सुविधांशी संबंधित अडचणींवर चर्चा करण्यासाठी त्यांनी आज (गुरुवारी) पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त व प्रशासक शेखर सिंह यांच्या समवेत एक महत्त्वाची बैठक घेतली. या बैठकीला चिंचवड मतदारसंघातील माजी नगरसेवक देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते.**



### गाजवले पहिलेच अधिवेशन..

विधानसभा निवडणूक झाल्यानंतर झालेल्या नागपूर अधिवेशनात निळ्या पूररेषेतील बांधकामांसह मतदारसंघातील विविध प्रश्नांवर आवाज उठवत आमदार जगताप यांनी अधिवेशन गाजवले. वाहतूक समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन रस्त्यावर उतरत त्यांनी अधिकाऱ्यांना उपाययोजनांच्या आदेश दिले होते. त्या पाठोपाठ आयुक्तांसमवेत बैठक घेत आमदार जगताप यांनी मतदारसंघातील विकासकामांना गती दिली.

### बैठकीत चर्चा झालेले मुद्दे..

### महत्त्वाचे प्रकल्प व निर्णय..

बटरफ्लाय ब्रिज : रखडलेला प्रकल्प पूर्ण करण्याचे निर्देश.
पिंपळे सौदागरचा जुना पूल : काम तातडीने सुरू करण्याची सूचना.
वाकड दत्त मंदिर रस्ता : प्रलंबित रस्त्याचे काम गतीने पूर्ण करणे.
शाफ्ट तंत्रज्ञानाचा वापर : पाणीपुरवठा सुधारण्यासाठी आयआयटीच्या तंत्रज्ञानाचा तातडीने वापर.
मोकाट कुत्र्यांवर नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना.
बेकायदेशीर नळ कनेक्शनवर कारवाई.

कचरा व्यवस्थापन व स्वच्छता : शहरातील कचऱ्याचे प्रभावी व्यवस्थापन आणि रस्त्यांची नियमित स्वच्छता.

पाणीपुरवठा व विद्युत समस्या कमी दाबाने होणारा पाणीपुरवठा आणि वारंवार येणाऱ्या विद्युत समस्यांवर तातडीने उपाययोजना.

वाहतूक कोंडी व रस्ते सुधारणा :
वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी नवीन प्रकल्पांना गती.

**फुटपाथवरील अतिक्रमण :** पादचाऱ्यांच्या सोयीसाठी अतिक्रमण हटवून फुटपाथची योग्य देखभाल. स्थापत्य, ड्रेनेज व पाणीपुरवठा विभागासाठी पुरेशी बजेट तरतूद. बैठकीला माजी महापौर माई ढोरे, माजी उपमहापौर सचिन चिंचवडे, भाजपचे चिंचवड विधानसभा अध्यक्ष काळूराम बारणे, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके तसेच माजी नगरसेविका माधुरी कुलकर्णी, अश्विनी चिंचवडे, चेतन भुजबळ, सुरेश भोईर, राजेंद्र गावडे, नीता पाडाळे, ज्योती भारती, अभिषेक बारणे, तानाजी बारणे, संदीप गाडे, सिद्धेश्वर बारणे, आरती चोंधे, निर्मला कुटे, सागर अंघोळकर, वैशाली जवळकर, महेश जगताप, हर्षल ढोरे, संतोष कांबळे, शारदा सोनावणे, शेखर चिंचवडे, राहुल जवळकर, हर्षद नढे, हिरेन सोनावणे, संकेत चोंधे, विलास पाडाळे आणि संकेत कुटे आदी उपस्थित होते.

चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या प्रलंबित विकासकामांना गती देऊन नागरिकांना मूलभूत व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधींनी सक्रिय भूमिका घेण्याचा निर्धार या बैठकीत करण्यात आला.

---

## वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पीके चौकात अंडरपास करावा

## माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांचे आयुक्तांना निवेदन

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यात गोहत्या बंदी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि गोरक्षकांच्या मागण्यांसाठी महायुती सरकारकडे पाठपुरावा करणार आहोत. तसेच, या पुढील काळातही गोसंवर्धनासाठी शेती-माती-संस्कृतीसाठी कटिबद्ध आहोत. कायदा असतानाही गोहत्या केली जात असेल, तर भगवाधारी महायुतीच्या सरकारमध्ये कुणाचेही लांगुलचालून करु देणार नाही.**



पिंपळे सौदागर मधील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी पीके चौक अंडरपास निर्माण करावा. स्वराज गार्डन चौक येथील गार्डनचे आरक्षण बदलून त्या ठिकाणी जलतरण तलाव व बॅडमिंटन हॉल उभारण्यात यावा. अश्या विविध मागण्यांचे निवेदन माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना दिले. यावेळी चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप हे देखील उपस्थित होते.

नाना काटे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रभाग क्र.२८ रहाटणी पिंपळे सौदागर येथील नाशिक फाटा ते वाकड या बीआरटीएस मार्गावरील पीके चौक येथे नागरिकांना सततच्या वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. या मार्गावर हिंजवडी, वाकड, पुणे येथे कामानिमित्ताने जाणाऱ्यांसाठी हा सोपा मार्ग असल्याने या मार्गाचा नागरिक मोठ्या प्रमाणात वापर करतात. तसेच जवळ असणाऱ्या भोसरी, चाकण, खेड औद्योगिक परिसरातील मोठे मालवाहतूक करणारी वाहने देखील या मार्गाचा मोठ्या प्रमाणात वापर करतात. त्यामुळे पीके चौक येथे सातत्याने वाहतूक कोंडी होत असते आणि यामुळे आत्ता पर्यंत अनेक छोटे मोठे अपघात या चौकात झालेले आहेत. त्यामुळे नागरिकांना होणाऱ्या त्रासामधून सुटका होण्यासाठी या ठिकाणी अंडरपास, भुयारी मार्ग निर्माण करावा अशी मागणी काटे यांनी केले.

### आयुक्त शेखर सिंह यांचे आश्वासन

तसेच प्रभाग क्र.२८ रहाटणी सौदागर येथील आरक्षण क्र.३६१ मधील गार्डन वापराचे आरक्षण बदलून त्या जागी जलतरण तलाव व बॅडमिंटन हॉल तयार करावा या बद्दलचे पत्र या वेळी दिले. जेणेकरून या उपक्रमाचा फायदा पिंपळे सौदागर येथील २३० हून अधिक निवासी सोसायट्यांना होईल. त्याच बरोबर दिवसेंदिवस महानगरपालिकेतील हॉस्पिटल मध्ये वाढणाऱ्या ICU व NICU बेडची मागणी लक्षात घेता सर्व महानगरपालिकेच्या हॉस्पिटल मधील बेडची संख्या वाढवण्यासाठी पत्र दिले जेणेकारीण उत्तम सेवेपासून मुकणाऱ्या आर्थिक दुर्बल व गरजू रुग्णांना याचा लाभ घेता येईल. यावर त्वरित कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासन पालिका आयुक्त शेखर सिंह यांनी नाना काटे यांना दिले.

# मशाल, तुतारीचं पुढं काय? ...खाली डोकं वर पाय !

**विधानसभा निवडणुकीनंतर सर्वात अडचणीत आलेले दोन पक्ष म्हणजे उद्धव ठाकरे यांची शिल्लक सेना आणि शरद पवार यांची शिल्लक राष्ट्रवादी काँग्रेस..म्हणजेच मशाल आणि तुतारी ! भारतीय जनता पार्टी प्रणित 'महायुती' चा झंजावात एवढा होता, की त्यात 'महाआघाडी' चा पालापाचोळा झाला, त्यातही सर्वात मोठा फटका उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या गटाला बसलाय. 'आघाडी' तील काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष असल्यामुळे त्याचे अस्तित्व इतर राज्यांमध्ये नक्कीच राहील. मशाल आणि तुतारी पुढे मात्र अस्तित्वाचा प्रश्न उभा राहिला आहे, हे लक्षात घ्यायला हवे.**



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

हे दोन्ही पक्ष आणि त्यांचे नेते गेल्या काही वर्षात सत्तेसाठी हपापलेले आहेत, हे जनतेने अनेकदा अनुभवले आहे. त्यात आता प्रचंड अपयश पदरी पडल्यामुळे पाच वर्षे विरोधी बाकांवर बसण्याशिवाय त्यांच्यापुढे पर्याय नाही. तथापि, या पक्षांच्या आमदारांची आणि कार्यकर्त्यांची विरोधात बसण्याची मानसिकता नसावी. त्यामुळे कधी एकदा भारतीय जनता पार्टी किंवा 'महायुती' तील अन्य दोन पक्षांमध्ये प्रवेश करतो, असे कार्यकर्त्यांना झाले असावे. आपले कार्यकर्ते, नेते आमदार कसे पकडून ठेवायचे, ही खरी आता उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांची कसोटी आहे ! राजकीय विश्लेषकांच्या मते मात्र आता, मशाल अन् तुतारीची अवस्था 'खाली डोकं वर पाय' अशी झालेली आहे.

## राजकीय परिस्थितीच बदलली !

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांनी एक स्पष्ट संदेश दिला आहे, तो म्हणजे राज्यावर 'महायुती'ने विना अडथळा राज्य करावे, बडबड करणाऱ्या विरोधकांनी आता गप्प बसावे ! 'महायुती' चे कर्तृत्व आणि विरोधकांची बाष्कळ बडबड, टीका-टिप्पणी आम्हाला मान्य नाही, असाच कौल महाराष्ट्राच्या मतदारांनी दिल्याचे स्पष्ट दिसते आहे. विरोधी पक्षांचा आवाज नगण्य करून मतदारांनी तो बंदच केला आहे. विधानसभेत विरोधी पक्षनेता होऊ नये, असा हा स्पष्ट कौल आहे. विरोधकांनी पराभवाची कारणमीमांसा करून ईव्हीएम, लाडकी बहीण योजनेवर भरभरून आगपाखड केली. सुरुवातीला या मुद्द्यांवर प्रचंड कांगावा केला, धरणे धरले, आंदोलने केली.. पण आता, तो कांगावा संपवून पराभवाचे कटू सत्य स्वीकारण्याची वेळ विरोधकांवर आली आहे. यातच काँग्रेसअंतर्गत एकमेकांवर पराभवाचे खापर फोडणे सुरू झाले आहे. उद्धव ठाकरे सेना, शरद पवार राष्ट्रवादी गटातही काँग्रेससोबतचा पुढचा प्रवास पराभवाच्या खाईत आणि आपल्या उरल्या सुरल्या पक्षासाठी धोक्याच्या वाटचालीचा वाटू लागला आहे. तिकडे काँग्रेसचे नेते नाना पटोले, विजय वडेट्टीवार यांच्यासह काँग्रेसमध्येही अस्वस्थता वाढली असून, अनेकजण भाजपा, एकनाथ शिंदे यांची शिवसेना, प्रसंगी अजितदादा यांची राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करण्याच्या चर्चा करू लागले आहेत. थोडक्यात काय, सत्तेच्या वळचणीला वळायचा विचार करू लागलेत, यालाच म्हणायचं, गुलाल तिकडं चांगभलं!





## उबाठा, शरद पवार गटाचे पुढे काय?

राज्यातील विरोधी पक्षांना आणि त्यातही खास करून उद्धव ठाकरे तसेच शरद पवार गटाला भवितव्याच्या संकटाने ग्रासले आहे. यापुढे नेमकी कशी राजकीय वाटचाल करावी, हा प्रश्न या अभूतपूर्व निकालाने त्यांना नक्कीच पडला असेल. खरे तर काँग्रेस समोरही हा प्रश्न नक्कीच आहे. परंतु राष्ट्रीय पक्ष असल्यामुळे काँग्रेसच्या आमदारांना कोणताही निर्णय घेण्यापूर्वी बराच विचार करावा लागणार आहे. शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचे उरले, सुरलेले पक्ष किंवा गट हे प्रादेशिक पक्षच आहेत. त्यामुळे या पक्षांचे पक्षश्रेष्ठी महाराष्ट्रातच आहेत. या पक्षांची इतर राज्यात फारशी ताकद नाही किंवा अजिबात नाही, असे म्हटले तरी हरकत नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील राजकारणाचा या पक्षांच्या वाटचालीवर परिणाम होणे स्वाभाविक आहे, हा मुद्दा आता महत्त्वाचा आहे. या राजकीय पार्श्वभूमीवर पुढची पाच वर्षे नेमकी कोणती भूमिका घ्यायची, यावरून या दोन्ही पक्षांमध्ये पडद्याआड विचार मंथन सुरू असल्याचे चित्र आहे. यामध्ये विशेषतः शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या संदर्भातील चर्चा मात्र चांगल्याच रंगल्या आहेत. दस्तुरखुद्द जयंत पाटील हेच अजितदादा गट अथवा भाजपामध्ये लवकरच प्रवेश करतील अशा प्रकारच्या चर्चानाही ऊत आला आहे. स्वतः, अजितदादांनीही खुली ऑफर असल्याचा आणि ते प्रतिसाद देत नसल्याचा गौप्यस्फोट नागपूरच्या अधिवेशनात केला होता. दुसरीकडे, उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरेंच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या चार-पाच भेटीतूनही वेगळ्या वाटचालीची चर्चा होऊ लागली आहे. त्यामुळे एकूणच विरोधकांच्या अस्वस्थ अवस्थेत भरच पडत चालली आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने एक महत्त्वाची बैठक या महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात बोलावली आहे. या बैठकीला पक्षाचे सगळे आजी-माजी आमदार, खासदार आणि जिल्हाध्यक्षांना निमंत्रित करण्यात आले आहे. यपुढची राजकीय वाटचाल कशी असावी, यासंदर्भात वैचारिक मंथन होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे, अशा प्रकारची गुप्त माहितीया दोन्ही गटाचे नेते देत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसमधील आमदारांचा एक गट अजित पवारांसोबत जाण्यास उत्सुक आहे किंवा शरद पवारांनी आपला गट अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत विसर्जित करून एकत्र राष्ट्रवादी पुन्हा ताकदीने उभी करावी, असे त्या गटाचे म्हणणे आहे. सत्तेशिवाय पाच वर्ष राजकारण करणे शक्य नाही. पाच वर्षांनंतर पुन्हा निवडणुकीला सामोरे जाताना लोकांसमोर काम घेऊन जावे, कोणते मुद्दे मांडावेत, हा प्रश्न आहे. त्यापेक्षा दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे विलीनीकरण करून एकच एकसंघ आणि ताकदवर राष्ट्रवादी पक्ष उभा करावा, असा आग्रह काही आमदारांचा असल्याचे बोलले जात आहे. अर्थात सगळ्याच आमदारांचे असे मत आहे असे नाही. काहींनी विरोधी पक्षात बसूनच आपण आपला पक्ष मजबूत करावा, असा विचार मांडला आहे. या सगळ्यांच्या मतांवर, विचारांवर सखोल चिंतन करण्यासाठीच शरद पवार यांच्या गटाने महत्त्वाची बैठक आयोजित केली आहे. कदाचित, विरोधी पक्षात राहून राजकारण करण्यापेक्षा सत्तेसोबत सामील होऊन मतदारसंघाच्या विकासाचे राजकारण करणे अधिक श्रेयस्कर आहे, हा मतप्रवाह शरद पवारांच्या गटामध्ये जोरात असला तरी किमान तीन ते चार आमदार अजित पवारांसोबत जाण्यास विरोध करीत असल्याची चर्चा आहे. त्या आमदारांची समजूत काढली जाते की त्या आमदारांची भूमिका योग्य मानून पुढील पाच वर्षे विरोधी बाकावर बसूनच पक्ष मजबुतीसाठी प्रयत्न करण्याचा निर्णय घेतला जातो, हे या बैठकीनंतर स्पष्ट होऊ शकते. तथापि, पुढच्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला या संदर्भात निर्णय घ्यावाच लागेल, हे सांगणे महत्त्वाचे आहे, ते आता कळू शकणार नाही.

## मुंबई महापालिका निवडणूक.. लिटमस टेस्ट !

आता बिगुल वाजेल ते स्थानिक स्वराज्य संस्था आणि विशेषतः मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी ! ही तर सर्वच पक्षांच्या अस्तित्त्वाच्या दृष्टीने लिटमस टेस्ट आहे. केंद्र, राज्यातील सत्तेच्या उबीमुळे 'महायुती' चा तिथेही बोलबाला झाला आणि महाविकास आघाडीला तिथेही अपयश आले, तर पुढे पाच वर्षांनंतर राजकीय परिस्थिती काय असेल, हे सांगता येत नाही. त्यामुळे पाच वर्षे संघर्ष करूनही शेवटी झोळी रिकामीच राहिली तर सध्या हातचे सोडून पळत्याच्या मागे लागण्यात शहाणपण नाही, असा व्यावहारिक विचार शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमधील अनेक नेते करीत आहेत. खरे तर, ही समस्या उद्धव ठाकरेंच्या गटा समोरही आहे. एक दोन लोकांचा अपवाद सोडला तर शरद पवार यांच्या गटातील आमदार अजित पवारांचे नेतृत्व सहज मान्य करू शकतात आणि स्वतः शरद पवारदेखील आपले वय आणि प्रकृती लक्षात घेऊन राष्ट्रवादीच्या पुढील वाटचालीची सूत्रं अजित पवार आणि सुप्रिया सुळे यांच्या हाती सोपवू शकतात. परंतु उद्धव ठाकरेंच्या बाबतीत तसे काही होणे तितके सहज शक्य नाही.उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना आपल्या सहकाऱ्यांच्या भवितव्याचा विचार करता अतिशय महत्त्वाचा निर्णय घ्यावा लागणार आहे. निर्णय चुकला की आपला पक्ष संपला, हे मोठे राजकीय समीकरण डोळ्यासमोर ठेवावे लागणार आहे. पण, सध्या या दोन नेत्यांचे पक्ष म्हणजे गट अस्तित्वात तरी आहे का ? हा तमाम महाराष्ट्र पुढील प्रश्न आहे, त्याची चर्चा सुरू आहे !

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव. (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# काँग्रेसमध्ये लवकरच राजकीय भूकंप?

## काँग्रेसच्या नेत्यांबाबत गिरीश महाजनांचा मोठा दावा

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**विधानसभेच्या निवडणुकीत महायुतीला मिळालेल्या बहुमतानंतर राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झालं, तर महाविकास आघाडीला निवडणुकीत मोठं अपयश आलं. सरकार स्थापन होऊन एक महिना झाला आहे. मात्र, आता सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राज्यातील विविध घटनांवरून आरोप-प्रत्यारोप सुरु झाले आहेत. बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचे पडसाद राज्यात उमटत आहेत. यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये राजकारण तापलं आहे.**



दुसरीकडे महायुती सरकारमध्ये मंत्रिपदाची संधी न मिळाल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते छगन भुजबळ हे नाराज आहेत. त्यांच्या नाराजीवरूनही टीका-टिप्पणी सुरु आहे. या सर्व घडामोडींवरून काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर हल्लाबोल केला. त्यानंतर भाजपाचे नेते गिरीश महाजन यांनीही विजय वडेट्टीवार यांच्या टिकेला प्रत्युत्तर देत मोठं विधान केलं. "काँग्रेस पक्षासह सर्वच पक्षातील नेते आमच्याकडे येण्यासाठी नंबर लावून बसले आहेत", असा मोठा दावा गिरीश महाजन यांनी केला. त्यांच्या या विधानानंतर काँग्रेसच्या गोटात खळबळ उडाली आहे.बीडच्या प्रकरणाबाबत माध्यमांशी बोलताना काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी गंभीर आरोप केला होता. "मोठ्या आकाला वाचवण्यासाठी लहान आकाचा एन्काऊंटरही होऊ शकतो", असं खळबळजनक विधान विजय वडेट्टीवार यांनी केलं. त्यांच्या या विधानासंदर्भात गिरीश महाजन यांना प्रश्न विचारण्यात आला. यावर बोलताना गिरीश महाजन म्हणाले, "विजय वडेट्टीवार हे काहीही बोलत असतात. आता राज्यातील विरोधी पक्षाची परिस्थिती कशी झाली आहे? हे आपल्याला माहिती आहे. त्यामुळे काहीतरी भडक बोलायचं आणि कोणावर तरी काहीतरी आरोप करायचे? असं विरोधकांचं काम झालं आहे. बीडचं प्रकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिशय गांभीर्याने घेतलं आहे. ज्या-ज्या मागण्या झाल्या त्याबाबत चौकशी झाली आहे. त्या प्रकरणात जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई होईल अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीसांनी दिली. त्यामुळे विरोधी पक्षाकडून होणारे आरोप निराधार आहेत", असं म्हणत गिरीश महाजन यांनी विजय वडेट्टीवार यांना प्रत्युत्तर दिलं.दरम्यान, आज काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी राज्यातील विविध मुद्द्यांवर भाष्य केलं. यावेळी छगन भुजबळ यांच्या संदर्भात बोलताना विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं की, निवडणुकीत ओबीसी नेते म्हणून भुजबळांचा महायुतीने वापर केला गेला. मात्र, त्यानंतर त्यांना न्याय दिला नाही. ते आमच्याकडे येऊ शकतात, असं वडेट्टीवारांनी म्हटलं असल्याचा प्रश्न गिरीश महाजनांना माध्यमांच्या प्रतिनिधींनी विचारला. यावर बोलताना गिरीश महाजन म्हणाले, "छगन भुजबळ हे सक्षम आहेत, त्यामुळे ते ठरवतील. आता एवढ्या वाईट परिस्थितीत त्यांच्याकडे (काँग्रेसकडे) कोण जाईल? उलट त्यांच्याकडे जे आहेत तेच आमच्याकडे नंबर लाऊन बसलेले आहेत. काँग्रेस पक्षासह सर्व पक्षातील मंडळी आमच्याकडे नंबर लावून बसले आहेत. आता आमचं काय? आम्हाला तुमच्याकडे कधी घेता?", असा मोठा दावा गिरीश महाजन यांनी केला आहे.दुसरीकडे महायुती सरकारमध्ये मंत्रिपदाची संधी न मिळाल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते छगन भुजबळ हे नारज आहेत. त्यांच्या नाराजीवरूनही टीका-टिप्पणी सुरु आहे. या सर्व घडामोडींवरून काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर हल्लाबोल केला. त्यानंतर भाजपाचे नेते गिरीश महाजन यांनीही विजय वडेट्टीवार यांच्या टिकेला प्रत्युत्तर देत मोठं विधान केलं. "काँग्रेस पक्षासह सर्वच पक्षातील नेते आमच्याकडे येण्यासाठी नंबर लावून बसले आहेत", असा मोठा दावा गिरीश महाजन यांनी केला. त्यांच्या या विधानानंतर काँग्रेसच्या गोटात खळबळ उडाली आहे.बीडच्या प्रकरणाबाबत माध्यमांशी बोलताना काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी गंभीर आरोप केला होता. "मोठ्या आकाला वाचवण्यासाठी लहान आकाचा एन्काऊंटरही होऊ शकतो.

### दोषी असतील त्यांच्यावर कारवाई

खळबळजनक विधान विजय वडेट्टीवार यांनी केलं. त्यांच्या या विधानासंदर्भात गिरीश महाजन यांना प्रश्न विचारण्यात आला. यावर बोलताना गिरीश महाजन म्हणाले, "विजय वडेट्टीवार हे काहीही बोलत असतात. आता राज्यातील विरोधी पक्षाची परिस्थिती कशी झाली आहे? हे आपल्याला माहिती आहे. त्यामुळे काहीतरी भडक बोलायचं आणि कोणावर तरी काहीतरी आरोप करायचे? असं विरोधकांचं काम झालं आहे. बीडचं प्रकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिशय गांभीर्याने घेतलं आहे. ज्या-ज्या मागण्या झाल्या त्याबाबत चौकशी झाली आहे. त्या प्रकरणात जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई होईल अशी ग्वाही मुख्यमंत्री फडणवीसांनी दिली. त्यामुळे विरोधी पक्षाकडून होणारे आरोप निराधार आहेत.

# तुमचे पोलीस खाते भ्रष्ट झाले आहे!

## संतोष देशमुख हत्येच्या तपासावर प्रकाश आंबेडकरांची टीका

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येमुळे राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. या प्रकरणातील काही आरोपी अजूनही फरार आहेत. यामुळे पोलिसांवर सर्वच स्तरातून टीका होत आहे. अशात या संपूर्ण प्रकरणाच्या तपासावर वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी अनेक प्रश्न उपस्थित करत, मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली आहे.**




यावेळी आंबेडकर यांनी फडणवीसांचे पोलीस खाते पूर्णपणे भ्रष्ट झाल्याचे म्हटले आहे. सरपंच संतोष देशमुख यांची हत्येतील फरार आरोपी आणि या प्रकरणाच्या तपासावरून प्रकाश आंबेडकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली आहे. प्रकाश आंबेडकर यांनी एक्सवर पोस्ट केली असून, त्यामध्ये ते म्हणाले की, "देवेंद्र फडणवीस यांचे पोलीस यंत्रणेवर अजिबात नियंत्रण नाही. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या मृत्यू प्रकरणी पहिल्यांदा स्थानिक पोलिसांनी चौकशी केली. त्यांना देशमुख हत्येप्रकरणी काहीही सापडले नाही. त्यानंतर पोलीस अधिक्षकांनी चौकशी केली, त्यांनाही काही सापडले नाही. त्यानंतर सीआयडीने चौकशी केली, त्यांनाही काही सापडले नाही. आता चौकशीसाठी एसआयटी स्थापन केली आहे.

### काही आरोपी अजूनही फरार आहेत

पुढे काय करणार? तर ही केस सीबीआयला देणार!"या पोस्टमध्ये प्रकाश आंबेडकर यांनी पुढे लिहिले आहे की, "देवेंद्र फडणवीस तुमचं पोलीस खातं पूर्णपणे भ्रष्ट झाले आहे, हे पहिल्यांदा लक्षात घ्या. नुसत्या कमिट्या स्थापन करून उपयोग नाही. ज्यांनी या प्रकरणाचा तपास योग्य केला नाही, त्यांना विचारा की तपास का झाला नाही? "बीड जिल्ह्यातील मस्साजोग या गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी अपहरण करून निर्घृन हत्या करण्यात आली होती. दरम्यान या प्रकरणातील काही आरोपींना पोलिसांनी अटक केली असून, यातील काही आरोपी अजूनही फरार आहेत.

# मोदी सरकार कुचकामी ठरले!

## आर्थिक स्थितीवरून खरगेंची पंतप्रधान मोदींवर टीका



। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी गुरुवारी मोदी सरकारवर जोरदार टीका करत, त्यांनी आर्थिक गोंधळ निर्माण केल्याचा आरोप केला आहे. या गोंधळामुळे सर्वसामान्यांचे जीवन विस्कळीत झाले आहे, असेही ते म्हणाले.एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये सत्ताधारी भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएवर टीका करताना खरगे म्हणाले की, “या अर्थिक गोंधळावर मोदी सरकारकडे कोणताही उपाय नाही. या आर्थिक गोंधळाला तोंड देण्यासाठी मोदी सरकार कुचकामी ठरले आहे.”**

आपल्या एक्स पोस्टच्या शेवटी मल्लिकार्जून खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना टोला लगावत म्हटले की, “नरेंद्र मोदी जी, तुमचा नव वर्षाचा संकल्प प्रत्येक नागरिकाचे जीवन उद्ध्वस्त करणाऱ्या जुमलांपेक्षा काही कमी नाही!”आपल्या पोस्टमध्ये मल्लिकार्जून खरगे यांनी ७ आर्थिक निर्देशांकांचा दाखला दिला आहे. ते म्हणाले, “सुवर्ण कर्जामध्ये ५० टक्के वाढ झाली आहे. वस्तू आणि सेवांचे एकूण मूल्य गेल्या ८ तिमाहीत मंद झाले असून, कार विक्री ४ वर्षांच्या नीचांकी पातळीवर गेली आहे. गेल्या ५ वर्षांत अभियांत्रिकी, उत्पादन, प्रक्रिया आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील वेतन केवळ ०.८ टक्के वार्षिक दराने वाढले आहे. गेल्या आठ तिमाहीत अन्नधान्य महागाई सरासरी ७.१ टक्के आहे. याचबरोबर जीवनावश्यक वस्तूंवर जीएसटी कर आकारणीमुळे घरगुती बचत कमी होत आहे. रुपयाने सर्वकालीन नीचांकी पातळी गाठल्यामुळे परदेशी निधीचा प्रवाह मंदावला असून, छोट्या गुंतवणूकदारांचे लाखो कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे.”संसदेचे हिवाळी अधिवेशन नुकतेच पार पडले. हे अधिवेशन विविध मुद्यांनी गाजले होते. याचबरोबर सत्ताधारी आणि विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे दोन्ही सभागृहांचे कामकाजही स्थगित करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अधिवेशना दरम्यान संसदेत विविध मुद्द्यांवर भाषण करत काँग्रेस आणि गांधी परिवारावर टीका केली होती. यावर राज्यसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रत्युत्तर दिले होते. राज्यसभेत बोलताना विरोधी पक्षनेते मल्लिकार्जून खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मुद्दे खोडून काढले होते. खरगे यांच्या राज्यसभेतील या १३ मिनिटांच्या भाषणाचा व्हिडिओही काँग्रेस पक्षाने सोशल मीडियावर शेअर केला होता. “नरेंद्र मोदी जी, तुमचा नव वर्षाचा संकल्प प्रत्येक नागरिकाचे जीवन उद्ध्वस्त करणाऱ्या जुमलांपेक्षा काही कमी नाही!”आपल्या पोस्टमध्ये मल्लिकार्जून खरगे यांनी ७ आर्थिक निर्देशांकांचा दाखला दिला आहे. ते म्हणाले, “सुवर्ण कर्जामध्ये ५० टक्के वाढ झाली आहे. वस्तू आणि सेवांचे एकूण मूल्य गेल्या ८ तिमाहीत मंद झाले असून, कार विक्री ४ वर्षांच्या नीचांकी पातळीवर गेली आहे. गेल्या ५ वर्षांत अभियांत्रिकी, उत्पादन, प्रक्रिया आणि पायाभूत सुविधा क्षेत्रातील वेतन केवळ ०.८ टक्के वार्षिक दराने वाढले आहे. गेल्या आठ तिमाहीत अन्नधान्य महागाई सरासरी ७.१ टक्के आहे. याचबरोबर जीवनावश्यक वस्तूंवर जीएसटी कर आकारणीमुळे घरगुती बचत कमी होत आहे. रुपयाने सर्वकालीन नीचांकी पातळी गाठल्यामुळे परदेशी निधीचा प्रवाह मंदावला असून, छोट्या गुंतवणूकदारांचे लाखो कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. ”संसदेचे हिवाळी अधिवेशन नुकतेच पार पडले. हे अधिवेशन विविध मुद्यांनी गाजले होते. याचबरोबर सत्ताधारी आणि विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे दोन्ही सभागृहांचे कामकाजही स्थगित करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अधिवेशना दरम्यान संसदेत विविध मुद्द्यांवर भाषण करत काँग्रेस आणि गांधी परिवारावर टीका केली होती.

### सुवर्ण कर्जामध्ये 50 टक्के वाढ

यावर राज्यसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रत्युत्तर दिले होते. सत्ताधारी आणि विरोधकांनी केलेल्या गदारोळामुळे दोन्ही सभागृहांचे कामकाजही स्थगित करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अधिवेशना दरम्यान संसदेत विविध मुद्द्यांवर भाषण करत काँग्रेस आणि गांधी परिवारावर टीका केली होती. यावर राज्यसभेचे विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रत्युत्तर दिले होते. खरगे यांच्या राज्यसभेतील या १३ मिनिटांच्या भाषणाचा व्हिडिओही काँग्रेस पक्षाने सोशल मीडियावर शेअर केला होता. “नरेंद्र मोदी जी, तुमचा नव वर्षाचा संकल्प प्रत्येक नागरिकाचे जीवन उद्ध्वस्त करणाऱ्या जुमलांपेक्षा काही कमी नाही!”आपल्या पोस्टमध्ये मल्लिकार्जून खरगे यांनी ७ आर्थिक निर्देशांकांचा दाखला दिला आहे. ते म्हणाले, “सुवर्ण कर्जामध्ये ५० टक्के वाढ झाली आहे.

# दोसांझवर शेतकरी आंदोलक संतापले

## शेतकरी आंदोलनात दिलजीत दोसांझ सहभागी झाला होता

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जगभरात प्रसिद्ध असलेला गायक आणि अभिनेता दलजीत दोसांझने नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. त्याने पंतप्रधान मोदींसोबतच्या संवादाचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केले आहेत.**



दरम्यान दलजीत आणि पंतप्रधानांच्या या भेटीवर शंभू सीमेवर आंदोलन करत असलेल्या शेतकऱ्यांनी संताप व्यक्त करत, “त्याला शेतकऱ्यांची खरंच काळजी असती तर त्याने सर्वात आधी इथे येऊन शेतकऱ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला असता”, असे म्हटले आहे. या संपूर्ण प्रकरणावर शेतकरी आंदोलकांनी निराशा व्यक्त केली आहे. दलजीत दोसांझने यापूर्वी शेतकरी आंदोलनाला पाठिंबा दिला होता. परंतु आता त्याची कृती त्यानेच दिलेल्या पाठिंब्याच्या विरोधात असल्याचेही शेतकऱ्यांनी म्हटले आहे. सध्या शंभू सीमेवर आंदोलन करत असलेल्या एका शेतकरी नेत्याने दलजीत दोसांझ आणि पंतप्रधान मोदींच्या भेटीवर टीका करताना म्हटले की, “जर दिलजीतला खरोखरच शेतकऱ्यांची काळजी असती, तर तो पंतप्रधान मोदींची भेट घेण्यापेक्षा इथे आला असता आणि संभू सीमेवर डल्लेवालजींसोबत एकजुटीने आमच्यात सहभागी झाला असता, आमच्या समस्या ऐकल्या असत्या आणि त्याने यापूर्वी केलेल्या विधानांवर ठाम राहिला असता. पंतप्रधान मोदींची भेट त्याच्या हेतूबद्दल शंका निर्माण करते.” याबाबत इंडिया टुडेने वृत्त दिले आहे. दरम्यान शेतकऱ्यांनी जोपर्यंत त्यांच्या सर्व मागण्या पूर्ण होत नाहीत तोपर्यंत त्यांचा संघर्ष सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

### त्याच्या हेतूबद्दल शंका निर्माण करते

सध्या शंभू सीमेवर आंदोलन करत असलेल्या एका शेतकरी नेत्याने दलजीत दोसांझ आणि पंतप्रधान मोदींच्या भेटीवर टीका करताना म्हटले की, “जर दिलजीतला खरोखरच शेतकऱ्यांची काळजी असती, तर तो पंतप्रधान मोदींची भेट घेण्यापेक्षा इथे आला असता आणि संभू सीमेवर डल्लेवालजींसोबत एकजुटीने आमच्यात सहभागी झाला असता, आमच्या समस्या ऐकल्या असत्या आणि त्याने यापूर्वी केलेल्या विधानांवर ठाम राहिला असता. पंतप्रधान मोदींची भेट त्याच्या हेतूबद्दल शंका निर्माण करते.

# 'स्त्री 2' अन् 'मुंज्या'चा पुढचा भाग येणार!

२०१८ मध्ये मॅडॉक फिल्म्सने श्रद्धा कपूर आणि राजकुमार राव यांच्या मुख्य भूमिका असलेला 'स्त्री' या हॉरर-कॉमेडी चित्रपट तयार केला होता. या शैलीत (आशयात) दमदार कामगिरी करत, मॅडॉक फिल्म्सने 'भेडिया', 'मुंज्या' आणि 'स्त्री २' सारख्या चित्रपटांनी प्रेक्षकांची मने जिंकली. या चित्रपटांना मिळालेल्या यशामुळे मॅडॉक फिल्म्सने एक वेगळे हॉरर-कॉमेडी युनिव्हर्स तयार केले. २०२५ पासून मॅडॉक फिल्म्स युनिव्हर्सचे नवे सिनेमे येणार असून , त्यात 'थामा', 'शक्तिशालिनी', आणि 'चामुंडा' यांसारख्या चित्रपटांची भर पडणार आहे. मॅडॉक फिल्म्स युनिव्हर्स २०२५ ते २०२८ दरम्यान या युनिव्हर्समधून दरवर्षी दोन चित्रपट सादर करणार आहेत. "या युनिव्हर्सचा दुसरा टप्पा २०२५ मध्ये दिवाळीत प्रदर्शित होणाऱ्या 'थामा' पासून सुरू होईल. त्यानंतर ३१ डिसेंबर २०२५ रोजी 'शक्तिशालिनी' प्रदर्शित होईल. यानंतर १४ ऑगस्ट २०२६ रोजी 'भेडिया २' आणि ४ डिसेंबर २०२६ 'चामुंडा' सिनेमा प्रदर्शित होणार आहे.१३ ऑगस्ट २०२७ रोजी बहुचर्चित 'स्त्री ३' आणि २४ डिसेंबर २०२७ रोजी 'महामुंज्या' प्रदर्शित होईल. यानंतर या युनिव्हर्सची भव्य कथा 'महायुद्ध' या दोन भागांच्या महाकाव्याद्वारे सादर होऊन या युनिव्हर्सच्या चित्रपटांचा शेवट होईल. मॅडॉक हॉरर-कॉमेडी युनिव्हर्समधील 'पेहला महायुद्ध' ११ ऑगस्ट २०२८ रोजी प्रदर्शित होईल, तर 'दुसरा महायुद्ध' दिवाळीत १८ ऑक्टोबर २०२८ रोजी मोठ्या पडद्यावर झळकणार आहे," असे मॅडॉक फिल्म्स त्यांच्या सोशल मीडियावर पोस्ट केले आहे.

# प्रसिद्ध बॉलीवूड गायकाने गुपचूप उरकलं लग्न

नवीन वर्षाच्या सुरुवातीला प्रसिद्ध बॉलीवूड गायक अरमान मलिक विवाहबंधनात अडकला आहे. अरमानने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर फोटो शेअर करून ही आनंदाची बातमी चाहत्यांना दिली. अरमानने त्याची गर्लफ्रेंड आशना श्रॉफशी लग्न केलं आहे. मागील बऱ्याच वर्षांपासून अरमान व आशना रिलेशनशिपमध्ये होते. अखेर दोघांनी लग्नगाठ बांधली असून आयुष्यातील नवीन प्रवासाला सुरुवात केली आहे. 'मैं रहूँ या ना रहूँ', 'जेहर', 'बोल दो ना जरा', 'पहेला प्यार', 'मुझको बरसात बना लो' अशा अनेक लोकप्रिय गाण्यांचा गायक अरमान मलिकने आयुष्यातील नवीन इनिंग सुरू केली आहे. अरमानने त्याची गर्लफ्रेंड आता पत्नी झाले आहेत. अरमानने इन्स्टाग्रामवर लग्नातील फोटो पोस्ट केले आहेत. 'तू है मेरा घर' असं कॅप्शन अरमानने या फोटोंना दिलं आहे.अरमान मलिकने पत्नी आशनाला टॅग करत लग्नाचे ६ फोटो शेअर केले आहेत, ज्यामध्ये ते दोघेही लग्नाचे विधी पूर्ण करताना दिसत आहेत. अरमान व आशना यांच्या लग्नातील लूकची खूप चर्चा होत आहे. आशना केशरी रंगाच्या लेहेंग्यात खूप सुंदर दिसत आहे, तर अरमानने फिकट गुलाबी रंगाची शेरवानी घातली आहे, दोघेही एकत्र खूप क्यूट दिसत आहेत.

# प्राजक्ता माळीचं हटके सेलिब्रेशन



अभिनेत्री प्राजक्ता माळी ही सोशल मीडियावर ॲक्टिव असते. प्राजक्ताच्या सोशल मीडियावरील पोस्ट नेटकऱ्यांचे लक्ष वेधतात. नुकताच प्राजक्तानं एक खास व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये प्राजक्ता ही तिच्या कुटुंबासोबत 31 डिसेंबरचं सेलिब्रेशन करताना दिसत आहे. प्राजक्तानं शेअर केलेल्या व्हिडीओमध्ये ती कुटुंबासोबत ॲनिमल या चित्रपटामधील 'जमाल कुडू' या गाण्यावर डान्स करताना दिसत आहे. प्राजक्तानं डोक्यावर एक ग्लास ठेवलेला दिसत आहे. तसेच प्राजक्तानं तिच्या कुटुंबासोबत 'मै हूं डॉन' या गाण्यावर देखील डान्स केला. व्हिडीओमध्ये प्राजक्ता ही चुलीजवळ बसून भाकऱ्या थापताना देखील दिसत आहे. या व्हिडीओला प्रजक्तानं कॅप्शन दिलं, "ABOUT 31ST DECEMBER, आमचे बॅबी देओलस आणि डॉनस... यात माझा 2024चा शेवटचा सेल्फी आणि 2025 चा पहिला सेल्फी देखील आहे." प्राजक्तानं शेअर केलेल्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव देखील केला आहे. एका नेटकऱ्यानं प्राजक्ताच्या व्हिडीओला कमेंट केली, "प्राजक्ता..खूपच भारी आहेस तू.कुटुंबाबरोबर जे तुझे क्षण असतात त्यांत तू खूप खुश, सुंदर दिसतेस. प्राजक्ता सर्व गुण संपन्न मुलगी." तर दुसऱ्या युझरनं कमेंट केली, "असेच क्षण जपायचे असतात प्राजक्ता आणि तू ते खुप भारी जपतेस THAT'S WE LOVE YOU . तू भाकरी करतानाचा पूर्ण व्हिडीओ टाक ना . मी मागे म्हटले होते ना की तु All ROUNDER आहेस तला भाकरी करतांना पाहून ते सिद्ध झाले.

# 'मी टू' प्रकरणात झालेले आरोप

दिग्दर्शक साजिद खान २०१८ मध्ये 'हाउसफुल ४'चे शूटिंग करताना त्याच्यावर अनेक महिलांनी #METOO मोहिमेंतर्गत लैंगिक शोषणाचे आरोप केले होते. या आरोपांमुळे त्याचे जीवन पूर्णतः बदलून गेले. तब्बल सहा वर्षे त्याने याबाबत मौन बाळगले. अलीकडेच त्याने एका मुलाखतीत या संदर्भात वक्तव्य केले आहे. साजिद खानने 'हिंदुस्तान टाइम्स'ला दिलेल्या मुलाखतीत गेल्या सहा वर्षांच्या काळाबद्दल सांगितले. साजिद म्हणाला, "या सहा वर्षांत अनेक वेळा स्वतःला संपवण्याचे विचार माझ्या मनात आले. भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी दिग्दर्शक संघटनेने (IFTDA) परवानगी दिल्यानंतरही मला काम मिळालं नाही. या काळात कमाई नसल्यानं मला माझं घर विकावं लागलं आणि भाड्याच्या फ्लॅटमध्ये राहावं लागलं."साजिद म्हणाला, "करिअरच्या सुरुवातीच्या काळात, मी केवळ चर्चेत राहण्यासाठी खळबळजनक गोष्टी बोलत असे. जेव्हा मी टीव्हीवर काम करीत होतो, तेव्हा माझं काम लोकांचं मनोरंजन करणं होतं. पण, माझ्या काही वक्तव्यांनी मी अनेक लोकांना नाराज केलं. आज मी माझ्या काही जुन्या मुलाखती पाहतो, तेव्हा मला वाटतं की मी टाईम मशीन घेऊन जाऊन स्वतःला थांबवावं आणि सांगावं, 'अरे मूर्खा, तू काय बोलतो आहेस?. जेव्हा माझ्या वक्तव्यांनी लोकांची मनं दुखावली जात आहेत याची मला जाणीव झाली, तेव्हा मी त्यांची माफी मागितली."साजिद पुढे म्हणाला, "जेव्हा तुमच्याकडे काम नसतं, तेव्हा तुम्ही तुमच्या जीवनाबद्दल विचार करू लागता. आता मी शांत झालो आहे. आता मी केवळ कामावर लक्ष केंद्रित करू इच्छितो."

# बायकोचा सिनेमा ब्लॉकबस्टर



२०२४ हे वर्ष भारतीय सिनेसृष्टीसाठी करोनानंतरच्या काही वर्षांपेक्षा चांगलं राहिलं. या वर्षभरात अनेक चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर दमदार कमाई केली; दुसरीकडे काही चित्रपटांचं बजेट जास्त असूनही ते फ्लॉप ठरले. एका सुपरस्टारने प्रचंड पैसे खर्च करून तयार केलेला एक चित्रपट बॉक्स ऑफिसवर सपशेल आदळला. तर या सुपरस्टारच्या पत्नीने मात्र ब्लॉकबस्टर सिनेमा दिला. या दाक्षिणात्य अभिनेत्रीने २०२४ मध्ये एक सुपरहिट चित्रपट दिला, तर तिच्या पतीच्या महागड्या चित्रपटाला थिएटरमध्ये प्रेक्षक मिळाले नाही. कमाई तर सोडाच, हा चित्रपट निर्मिती खर्चही वसूल करू शकला नाही. ज्या सेलिब्रिटी जोडप्याबद्दल आम्ही बोलतोय, ते म्हणजे अभिनेत्री ज्योतिका आणि सूर्या होय.ज्योतिकासाठी २०२४ हे वर्ष खूप खास राहिलं. तिचा 'शैतान' सिनेमा मार्च महिन्यात रिलीज झाला होता. हा भयपट होता. या चित्रपटातून तिने हिंदी सिनेविश्वात पुनरागमन केलं. या चित्रपटात ज्योतिकाने अभिनेता अजय देवगणच्या पत्नीची भूमिका केली होती. 'शैतान'चे दिग्दर्शन विकास बहलने केलं होतं. या चित्रपटात जानकी बोडीवाला महत्त्वाच्या भूमिकेत होती. तर यामध्ये आर माधवन खलनायकाच्या भूमिकेत होता. या चित्रपटाची कथा लोकांना फार आवडली आणि 'शैतान' ने बॉक्स ऑफिसवर तुफान कमाई केली. हा गुजराती चित्रपटाचा रिमेक होता. याव्यतिरिक्त ज्योतिका 'श्रीकांत' सिनेमात झळकली होती, त्यानेही बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली होती.आयएमडीबीच्या वृत्तानुसार, ज्योतिका व अजय देवगणच्या 'शैतान' सिनेमाच्या निर्मितीसाठी तब्बल ९५ कोटी रुपयांचा खर्च निर्मात्यांनी केला होता. या चित्रपटाने देशभरात १७६.२ कोटी रुपयांची कमाई केली होती, तर जगभरात २१३.८ कोटी रुपये कमावले. ज्योतिकाचा पती व अभिनेता सूर्याचा फ्लॉप ठरलेला चित्रपट म्हणजे 'कंगुवा' होय. हा चित्रपट नोव्हेंबर महिन्यात रिलीज झाला होता. यात सूर्या मुख्य भूमिकेत होता. यामध्ये बॉलीवूड अभिनेता बॉबी देओल खलनायकाच्या भूमिकेत होता. सूर्या व बॉबी यांच्या सिनेमातील लूकची प्रचंड चर्चा झाली होती.सूर्याच्या 'कंगुवा'साठी निर्मात्यांनी खूप पैसा खर्च केला होता. तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण हा चित्रपट तब्बल ३५० कोटी रुपये खर्च करून तयार करण्यात आला होता. सिनेमा रिलीज होण्यापूर्वी त्याची खूप चर्चा होती, मात्र सिनेमागृहांमध्ये रिलीज झाल्यावर त्याकडे प्रेक्षकांनी पाठ फिरवली. आयएमडीबीच्या वृत्तानुसार, सूर्याचा चित्रपट 'कंगुवा'ने भारतात ८१.४ कोटी रुपयांचे कलेक्शन केले. तर, जगभरात या चित्रपटाने १०५.२ कोटी रुपयांची कमाई केली. हा चित्रपट बजेटच्या निम्मीही कमाई करू शकला नाही आणि बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला.

# रोहित सिडनी कसोटीत विश्रांती घेणार!

## गिल-बुमराह भेट, सोशल मीडियावर चर्चांना उधाण

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रोहित शर्मा ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या सिडनीमध्ये होणाऱ्या पाचव्या कसोटी सामन्यात खेळताना दिसणार नाही. गौतम गंभीरने रोहित शर्मा सिडनी कसोटीत खेळणार की नाही, या प्रश्नावर दिलेल्या उत्तरानंतर रोहित शर्माच्या अखेरच्या कसोटी खेळण्याबाबत संभ्रम होता. यानतंर सोशल मीडियावर भारताच्या सराव सत्रादरम्यानचे अनेक व्हीडिओ फोटो समोर आल्याने रोहित शर्मा ही कसोटी खेळेल की नाही म्हणणारे बऱ्याच पोस्ट व्हायरल झाल्या होत्या, पण आता रोहित शर्माने स्वत:चं मोठा निर्णय घेतला असल्याचे समोर आले आहे.**




### बुमराह, गंभीर आणि रोहितमध्ये चर्चा

सिडनी क्रिकेट ग्राऊंडचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. त्यानंतर अजून काही सोशल मीडिया पोस्टवरून चर्चांना उधाण आलं आहे.सिडनीत होणाऱ्या पाचव्या कसोटीसाठी टीम इंडिया जोरदार सराव करत आहे. आज टीम इंडियाच्या सराव सत्राचे व्हिडिओ आणि फोटो समोर आले आहेत. यादरम्यान भारतीय खेळाडू स्लिप कॅचिंगचा सराव करतानाचा फोटो चर्चेचा विषय ठरला आहे. विराट कोहली, नितीश रेड्डी, केएल राहुल आणि यशस्वी जैस्वाल स्लिपमध्ये झेल घेण्याचा सराव करताना दिसले. यादरम्यान रोहित शर्मा दिसला नाही. रोहित नेहमी सामन्यात स्लिपमध्ये क्षेत्ररक्षण करताना दिसतो. याशिवाय रोहित शर्मा, जसप्रीत बुमराह आणि गौतम गंभीर खेळपट्टीची पाहणी करत असताना चर्चा करताना दिसले. यानंतर स्टेडियममध्ये बसूनही हे तिघे फार वेळ चर्चा करत होते. असे अनेक फोटो, व्हीडिओ चाहत्यांनी शेअर केले आहेत. यासर्व चर्चांवरूनच रोहित शर्मा आता सिडनी कसोटीत खेळणार की नाही.

इंडियन एक्सप्रेसच्या ताज्या वृत्तानुसार, रोहितने स्वतःला संघाबाहेर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. रोहितच्या जागी जसप्रीत बुमराह संघाचे नेतृत्व करताना दिसणार आहे. यासह शुबमन गिल पुन्हा एकदा प्लेइंग इलेव्हनचा भाग होईल. तर पाचव्या कसोटीत आकाशदीपच्या जागी प्रसिध कृष्णाला संधी मिळू शकते. इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, रोहितने प्रशिक्षक गौतम गंभीर आणि निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांना त्याची प्लेईंग इलेव्हनमधील निवड रद्द करण्याच्या निर्णयाची माहिती दिली आहे आणि या निर्णयावर या दोघांनी सहमती दर्शवली आहे. रोहितच्या या निर्णयाचा अर्थ असाही होऊ शकतो की मेलबर्नमधील बॉक्सिंग डे कसोटी रोहितची भारतासाठी शेवटची ठरली असावी, कारण यानंतर इंग्लंडच्या दौऱ्यापासून सुरू होणाऱ्या पुढील जागतिक कसोटी चॅम्पियनशिप चक्रामध्ये योजनांमध्ये रोहित शर्मा संघाच्या योजनांचा भाग नसू शकतो. सध्याच्या चक्रात भारत WTC फायनलसाठी पात्र ठरण्याची शक्यता फारच कमी आहे. रोहित शर्माच्या जागी आता संघात शुबमन गिलला प्लेईंग इलेव्हनमध्ये संधी मिळणार आहे. मेलबर्न कसोटीत शुबमन गिलला वगळण्यात आल्यानंतर पत्रकार परिषदेत सहाय्यक प्रशिक्षक अभिषेक नायर यांना त्यासंदर्भात प्रश्न विचारण्यात आलं होतं. त्यावेळी शुबमनला वगळलेलं नसल्याचं त्यांनी स्पष्ट केलं होतं. संघाचं संतुलन योग्य असावं याद्दष्टीने वॉशिंग्टनला संघात स्थान देण्याचा निर्णय झाला, यामुळे गिलला अंतिम अकरात जागा मिळू शकली नाही असं ते म्हणाले होते. रोहित शर्माने सिडनी कसोटीत विश्रांतीचा निर्णय घेतल्याने गिलचा संघात परतण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.दरम्यान पाठीच्या दुखण्यामुळे वेगवान गोलंदाज आकाश दीप सिडनी कसोटीत खेळू शकणार नाही. त्याच्याऐवजी हर्षित राणाला संधी मिळणार का प्रसिध कृष्णाला याविषयी उलटसुलट चर्चा सुरू होत्या. हर्षित राणा पर्थ कसोटीत खेळला होता. मात्र प्रदीर्घ स्पेल टाकल्यानंतर त्याची दमछाक उडाली होती. त्यामुळे सिडनी कसोटीत प्रसिध कृष्णाला अंतिम अकरात खेळवण्यात येणार आहे. कृष्णाने वर्षभरापूर्वी शेवटचा कसोटी सामना खेळला होता. २ कसोटीत त्याने २ विकेट्स पटकावल्या आहेत. रोहित शर्मा सिडनी कसोटी खेळणार की नाही, हा यक्षप्रश्न सर्वच चाहत्यांना भेडसावत आहे. सिडनी कसोटीपूर्वीच रोहित शर्मा प्लेइंग इलेव्हनमधून बाहेर पडणार असल्याचे संकेत मिळत असल्याने प्रश्न उपस्थित होत आहेत.

# मनू भाकेर, डी गुकेशसह चार खेळाडूंना खेलरत्न

## चार क्रीडापटूंना 17 जानेवारीला होणार पुरस्काराचे वितरण

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने आज राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२४ ची घोषणा केली आहे. १७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता राष्ट्रपती भवन येथे आयोजित कार्यक्रमात पुरस्कार विजेत्यांना राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.**



### पॅरा अथलीट प्रवीण कुमार

याबरोबर त्याने गेल्या वर्षी बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारतीय संघाला ऐतिहासिक सुवर्ण पदक जिंकण्यात मदत केली होती.२०२४ च्या खेलरत्न पुरस्कार जिंकणाऱ्या खेळाडूंमध्ये चौथे नाव पॅरा अथलीट प्रवीण कुमार याचे आहे. प्रवीण कुमारने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये उच्च उडी या खेळ प्रकारात भारताचे प्रतिनिधीत्व केले होते. त्याला पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये टी ६४ चॅम्पियन म्हणून गैरविण्यात आले होते. ज्या खेळाडूंना गुडघ्याच्या खाली एक किंवा दोन्ही पाय नसतात ते टी ६४ प्रकारच्या खेळात सहभागी होत असतात.

यामध्ये २०२४ च्या ऑलिम्पिकमध्ये दोन पदके जिंकणारी नेमबाज मनू भाकेर, जागतिक बुद्धिबळ चॅम्पियन डी गुकेश, हॉकीपटू हरमनप्रीत सिंग आणि पॅरा अथलीट प्रवीण कुमार या चार क्रीडापटूंना मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे.दरम्यान, हे पुरस्कार जाहीर होण्यापूर्वी केंद्र सरकारकडून क्रीडा क्षेत्रातील सर्वोत्तम कामगिरीसाठी देण्यात येणाऱ्या ध्यानचंद खेलरत्न पुरस्कारच्या यादीत नेमबाज मनू भाकेरचे नाव नसल्याने मोठा वाद झाला होता. पण, आज जाहीर करण्यात आलेल्या राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारांमध्ये मनू भाकेरला मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार देण्यात आला आहे.अवघ्या २२ वर्षांच्या मनू भाकेरने ऑगस्टमध्ये झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत १० मीटर एअर पिस्तूल वैयक्तिक आणि १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक स्पर्धेत दोन कांस्य पदके जिंकली होती. यासह मनू एकाच ऑलिम्पिक स्पर्धेत दोन पदके जिंकणारी स्वतंत्र भारताची पहिली ऍथलीट बनली आहे. दरम्यान याच ऑलिम्पिक स्पर्धेत हरमनप्रीत सिंगने त्याच्या नेतृत्त्वाखाली भारतीय हॉकी संघाला सलग दुसरे कांस्यपदक मिळवून दिले होते. दुसरीकडे, नुकत्याच झालेल्या जागतिक बुद्धीबळ अजिंक्यपद स्पर्धेचे १८ वर्षांच्या डी गुकेशने जेतेपद पटकावले होते.